# मुंबई विद्यापीठ

## क्र.आस्था २ (४)/इएसटी/आयसीसी/२०१६–१७/८

परिपत्रक:–

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, मुंबई विद्यापीठ प्रशासनाने सर्व शिक्षकेत्तर अधिकारी कर्मचा–यांना वैद्यकिय गट विमा योजना (Group Health Insurance Policy) सन २०१४–२०१५ पासून कार्यान्वित केलेली आहे. वित्तीय वर्ष २०१६ –२०१७ करिता संबंधित विमा कंपनीने मागणी केलेली विम्याची रक्कम अवाजवी असल्याचे निदर्शनास आल्यामुळे प्रशासनाने कंपनीशी वाटाघाटी करण्याकरिता माजी सिनेट सदस्य प्राचार्य डॉ. गडदे व प्राचार्य डॉ. विजय जोशी यांची समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीची बैठक मान्यता प्राप्त कर्मचारी संघटनेबरोबर दिनांक १६ जुलै, २०१६ रोजी मा. कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली आणि त्यावर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला व सदरचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने मान्य केलेला आहे:–

१. वित्तीय वर्ष २०१५–२०१६ करिता विमा कंपनीस विम्याच्या हप्त्यापोटी अदा केलेली रूपये ९४,००,०००/– ( रूपये चौ–यान्नव लाख ) ही कायम (Base) रक्कम निश्चित करून त्यावरिल अधिकची वार्षिक विम्याची रक्कम सर्व शिक्षकेत्तर कर्मचा–यांकडून माहे जुलै, २०१६ पासून कुलगुरू निधीमध्ये खालील दराप्रमाणे जमा करण्यात येईल. :–

| वर्ग | दरमहा कपात करावयाची रक्कम (रूपये) |
|---|---|
| ' अ' | ३००/– |
| 'ब' | २५०/– |
| 'क' | २००/– |
| 'ड' | १५०/– |

२. विद्यापीठात आस्थापनावर असलेल्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून वरिलप्रमाणे दरमहा विमापोटी रक्कम जमा केल्यास रू. २९,१७,८००/– इतकी वार्षिक रक्कम जमा होईल. विद्यापीठ निधीतून देण्यात येणारी कायम रक्कम रू. ९४.०० लक्ष अधिक होईल. विद्यापीठ निधीतून देण्यात येणारी कायम रक्कम रू. ९४.०० लक्ष अधिक कर्मचाऱ्यांकडून जमा होणारी रू. २९.१७ लक्ष असे एकूण रू. १२३.१७ लक्ष जमा होणे अपेक्षित आहे. ही जमा होणारी रक्कम, व समितीव्दारे कंपनीशी होणाऱ्या वाटाघाटी मध्ये निश्चित होणारी रक्कम, यातील फरकाची रक्कम विद्यापीठ निधीवर अतिरिक्त भार देय होईल. तसेच पुढील वित्तिय वर्षामध्ये कर्मचाऱ्यांची वैद्यकीय दावे कमी अधिक झाल्यास वर नमूद केलेली कर्मचाऱ्यांची दरमहा वर्गणी सुद्धा कमी / अधिक होईल. कर्मचारी संघटनेला कर्मचाऱ्यांची कुलगुरू निधीतील दरमहा वर्गणी वाढविण्यात येत असल्याबाबत लेखी कळविण्यात आलेले आहे.

३. कर्मचाऱ्यांचे वैद्यकीय दावे वार्षिक हप्त्यापोटी देण्यात आलेल्या रक्कमेपेक्षा कमी झाल्यास पुढील वित्तिय वर्षामध्ये वार्षिक विमा हप्ता सुद्धा कमी झाला पाहिजे, अशी लेखी हमी कंपनीकडून घेण्यात आलेली आहे.

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक, विभागप्रमुख, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य, मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे प्रभारी ग्रंथपाल, स्थानापन्न परिक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख, यांनी सदर बाब संबंधित अधिकारी /कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणावी.

23/8/16
कुलसचिव

मुंबई–४०००३२.
२४ ऑगस्ट, २०१६.